मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# जलतरण तलाव, वॉशिंग सेंटर्स बंद ठेवण्याचे महापौरांचे आदेश

## पवना आणि आंद्रा धरणातील पाणीसाठ्यात मोठी घट झाल्याने शहरावर पाणी कपातीचे संकट गडद झाले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना आणि आंद्रा धरणातील पाणीसाठ्यात मोठी घट झाल्याने शहरावर पाणी कपातीचे संकट गडद झाले आहे. पवना धरणातील पाणीसाठा केवळ २० टक्क्यांवर तर आंद्रा धरणातील साठा २९ टक्क्यांवर आला आहे. यंदा पावसाने दडी मारल्यामुळे धरणांमधील उपलब्ध पाण्याचा साठा झपाट्याने कमी होत असून, पाटबंधारे विभागाने महापालिकेला १५ टक्के पाणी कपात करण्याच्या सूचना दिल्या आहेत.



या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने पाणी बचतीसाठी तातडीने उपाययोजना सुरू केल्या आहेत. पाणीपुरवठा विभाग परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून, पुढील पंधरवड्यात पाणी कपातीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येण्याची शक्यता आहे.

दरम्यान, शहरातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर महापौर रवी लांडगे यांनी प्रशासनाला कठोर पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत. शहरातील सर्व जलतरण तलाव तातडीने बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले असून, पाण्याचा अपव्यय करणाऱ्या वॉशिंग सेंटर्सही बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

महापौरांनी नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन करताना स्पष्ट केले की, पाण्याची नासाडी करणाऱ्या नागरिकांवर आणि व्यावसायिक आस्थापनांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करण्याचे निर्देशही प्रशासनाला देण्यात आले आहेत.

याशिवाय, ज्या भागांमध्ये पाणीपुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता आहे किंवा पाणीपुरवठा होणार नाही, त्या ठिकाणी महानगरपालिकेमार्फत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती महापौर रवी लांडगे यांनी दिली. शहरातील पाणीसंकट अधिक तीव्र होऊ नये यासाठी नागरिकांनी पाणी बचतीत सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# ऑटो टॅक्सी कष्टकरी बांधवांच्या आरोग्याची काळजी घेणे हे आपले कर्तव्य : शत्रुघ्न काटे

## पिंपरीत रिक्षा-टॅक्सी-कॅब चालकांसाठी भव्य मोफत नेत्र व आरोग्य तपासणी शिबिराचे भव्य शुभारंभ

**पिंपरी | प्रतिनिधी**

रिक्षा, टॅक्सी व कॅब चालक बांधवांच्या आरोग्य संवर्धनासाठी पिंपरीत मोफत नेत्र व आरोग्य तपासणी शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले. मोरवाडी मेट्रो स्टेशनजवळ झालेल्या या शिबिराचे उद्घाटन भारतीय जनता पक्षाचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष श्री. शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिमाखात पार पडले.



> **"दिवस-रात्र ऊन, वारा आणि पावसाची पर्वा न करता नागरिकांची सेवा करणाऱ्या रिक्षा, टॅक्सी आणि कॅब चालक बांधवांच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष होते, ही खेदाची बाब आहे. त्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी होणे आणि त्यांना वेळेवर उपचार मिळणे हे आपले सामूहिक कर्तव्य आहे. समाजातील तळागाळातील या कष्टकऱ्यांच्या कल्याणासाठी आम्ही नेहमीच ठामपणे उभे राहू आणि अशा आरोग्य उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन देत राहू.""**
> **- शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा.**

महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड (MNGL), महाराष्ट्र रिक्षा पंचायत आणि शिवरुद्र प्रतिष्ठान (ट्रस्ट) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमाला चालक बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पहिल्याच दिवशी तब्बल २०० हून अधिक रिक्षा, टॅक्सी व कॅब चालकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाराष्ट्र रिक्षा पंचायतीचे संस्थापक अध्यक्ष तथा ऑटो टॅक्सी ट्रान्सपोर्ट फेडरेशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबा कांबळे यांच्या हस्ते शत्रुघ्न (बापू) काटे यांचा संत तुकाराम महाराज यांची पगडी देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले की,"दिवस-रात्र ऊन, वारा, पाऊस याची पर्वा न करता नागरिकांना सेवा देणाऱ्या रिक्षा-टॅक्सी चालकांच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष होते. या कष्टकऱ्यांच्या कल्याणासाठी काम करणे हेच आमचे ध्येय आहे. समाजसेवेच्या भावनेतून अशा उपक्रमांना आम्ही नेहमीच पाठिंबा देत राहू." MNGL, महाराष्ट्र रिक्षा पंचायत आणि शिवरुद्र प्रतिष्ठान यांच्या संयुक्त प्रयत्नांचे कौतुक करत त्यांनी या उपक्रमामुळे चालकांना वेळेवर आरोग्य तपासणी व मोफत चष्मे मिळतील, असेही नमूद केले

दरम्यान, शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमद्वारे डोळ्यांची तपासणी, रंग आंधळेपणा चाचणी, मोतीबिंदू तपासणी, दृष्टीदोष तपासणी तसेच रक्तातील साखर (रँडम शुगर) तपासणी अशा विविध सेवा पूर्णपणे मोफत देण्यात आल्या. गरजूंना मोफत चष्मेही वाटप करण्यात आले.

डॉ. बाबा कांबळे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली असंघटित कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवल्या जात असून, अशा आरोग्य शिबिरांचे आयोजन महिनाभर शहरातील विविध भागांत केले जाणार आहे.

युवा नेते शुभम कांबळे यांनी चालकांच्या आरोग्य समस्यांकडे लक्ष वेधत, धूळ, प्रदूषण आणि दीर्घकाळ वाहन चालवण्यामुळे डोळ्यांचे विकार वाढत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास महाराष्ट्र रिक्षा पंचायतीचे युवक अध्यक्ष शुभम तांदळे, शिवरुद्र प्रतिष्ठानचे राहुल पाखरे, पुणे शहर युवक अध्यक्ष विशाल ससाने, पिंपरी-चिंचवड शहर उपाध्यक्ष भाऊसाहेब शेलार, तसेच विद्यार्थी विभागाचे प्रदीप आयर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मारवाडी मेट्रो विभाग उपाध्यक्ष श्याम मोरे, उमेश पवार, जयेश गायकवाड, महेश शिंदे, वैभव सरोदे, गणेश नवगिरे, मल्लेश मंत्री, प्रकाश मकासरे यांसह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# देहू-आळंदी पंचक्रोशीला मिळणार 'संतभूमी'चा दर्जा : आमदार शंकर जगताप

## आमदार शंकर जगताप यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी; वारकरी संप्रदायाचा सांस्कृतिक व आध्यात्मिक वारसा वृद्धिंगत होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

वारकरी संप्रदायाचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र देहू आणि श्री क्षेत्र आळंदी या पवित्र भूमीला 'संतभूमी' म्हणून घोषित करावे, अशी आग्रही मागणी चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.



आमदार शंकर जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रामध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्राला संतांची मोठी परंपरा लाभली आहे. संत ज्ञानेश्वर माउलींची संजीवन समाधी आळंदी येथे, तर जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे वास्तव्य आणि वैकुंठगमन देहू येथे झाले आहे. या दोन्ही ठिकाणांमधील १६ किलोमीटरचा परिसर वारकरी परंपरा, अध्यात्म आणि संत साहित्याने समृद्ध आहे. लाखो भाविकांचे हे अत्यंत श्रद्धेचे केंद्र असल्याने, या परिसराचे जतन आणि गौरव करणे काळाची गरज असल्याचे आमदार जगताप यांनी पत्रात नमूद केले आहे. उत्तराखंड राज्याने ज्याप्रमाणे आपल्या परिसराचा 'देवभूमी' म्हणून गौरव केला आहे, त्याच धर्तीवर देहू ते आळंदी या पंचक्रोशीला 'संतभूमी' म्हणून कायदेशीर दर्जा मिळावा, अशी मागणी स्थानिक नागरिक आणि वारकरी समाजातून होत आहे. याचा गांभीर्याने विचार करून सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आमदार जगताप यांनी पत्राद्वारे केली आहे.

### उत्तराखंडच्या धर्तीवर मागणी..

» उत्तराखंड राज्याने ज्याप्रमाणे आपल्या परिसराचा 'देवभूमी' म्हणून गौरव केला आहे, त्याच धर्तीवर देहू ते आळंदी या पंचक्रोशीला 'संतभूमी' म्हणून कायदेशीर दर्जा मिळावा, अशी मागणी स्थानिक नागरिक आणि वारकरी समाजातून होत आहे. याचा गांभीर्याने विचार करून सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आमदार जगताप यांनी पत्राद्वारे केली आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा गौरव वाढण्यासोबतच, वारकरी संप्रदायाचा सांस्कृतिक व आध्यात्मिक वारसा अधिक वृद्धिंगत होण्यास मदत होणार आहे.

"संत ज्ञानेश्वर माउली आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली ही भूमी वारकरी संप्रदायाचा श्वास आहे. या परिसराचा सांस्कृतिक व आध्यात्मिक वारसा जपणे ही काळाची गरज असून, 'संतभूमी'चा दर्जा ही त्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल असेल."उत्तराखंडच्या धर्तीवर देहू ते आळंदी या पंचक्रोशीला 'संतभूमी' म्हणून घोषित करणे, हे महाराष्ट्राच्या अध्यात्मिक परंपरेचा सन्मान ठरेल. यामुळे लाखो वारकऱ्यांच्या श्रद्धेचे प्रतीक असलेल्या या क्षेत्राचा सर्वांगीण गौरव वाढेल."

- आमदार शंकर जगताप, चिंचवड विधानसभा

# ऑक्सिजन पार्कच्या देखभालीसाठी पुन्हा त्याच संस्थेला थेट पद्धतीने काम?..

## चिंचवड व पुनावळेतील उद्यानांच्या देखभालीसाठी थेट काम देण्याचा प्रस्ताव; पारदर्शकतेबाबत नागरिकांकडून सवाल

**पिंपरी | प्रतिनिधी**

उद्योगांसाठी असलेल्या जागांचे निवासीकरण (आयटूआर) झाल्याने पिंपरी-चिंचवड महापालिकेला शहरातील विविध भागांतील ८३ ठिकाणी मिळालेली एकूण एक लाख ४६ हजार २३० चौरस मीटर क्षेत्रफळाची जागा वापराविना पडून आहे. त्यांपैकी काही जागांवर अतिक्रमण झाले असल्याचा दावा करण्यात आला आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील वाढते नागरीकरण, निवासी मिळकतींना मिळणारी मोठी पसंती, घरांची वाढती मागणी यामुळे औद्योगिक जागांवर मोठे गृहप्रकल्प उभारले जात आहेत. औद्योगिक कंपनी किंवा उद्योग बंद करून निवासी व व्यापारी संकुले बांधण्यासाठी महापालिकेची बांधकाम परवानगी घ्यावी लागते. औद्योगिक वापरासाठी असलेला हेतू बदलून निवासी व व्यापारी बांधकाम केल्याने त्या मोबदल्यात महापालिकेस एकूण जमिनीच्या पाच टक्के जागा विनामूल्य देणे नियमानुसार बंधनकारक आहे. जमिनीचा हा हिस्सा हस्तांतरित झाल्यानंतर संबंधित कंपनी किंवा उद्योगास तिथे नवीन प्रकल्पासाठी बांधकाम करण्यास महापालिकेकडून परवानगी दिली जाते. अशा प्रकारे शहरातील वेगवेगळ्या ठिकाणच्या कोट्यवधी रुपये किमतीच्या एकूण ८३ जागा महापालिकेला विनामूल्य मिळाल्या आहेत.

महापालिका या जागांवर आवश्यकतेनुसार नागरिकांसाठी सेवा व सुविधा (ॲमिनिटी स्पेस) निर्माण करते. त्यामध्ये उद्यान, मैदान, व्यायामशाळा, बहुउद्देशीय सभागृह, शाळा, दवाखाना, अग्निशमन केंद्र, पोलीस ठाणे, पार्किंग झोन, फूलबाजार, महात्मा गांधी स्मारक, जलतरण तलाव, बॅडमिंटन हॉल, क्षेत्रीय कार्यालय, पाण्याची टाकी आदींची उभारणी होते. मात्र, सध्या यातील बरीचशी जागा पडून आहे.

'आयटूआर'अंतर्गत दहा चौरस मीटरपासून २४ हजार ५४४ चौरस मीटरपर्यंतच्या जागा आतापर्यंत ताब्यात आल्या आहेत. शहरातील ८३ ठिकाणी मिळून एक लाख ४६ हजार २३० चौरस मीटर क्षेत्रफळ एवढी जागा महापालिकेला मिळाली आहे. पिंपरीगाव, मोरवाडी, चिंचवड, आकुर्डी, वडमुखवाडी, डुडुळगाव, चोविसावाडी, दिघी, भोसरी, चिखली, बोऱ्हाडेवाडी, पुनावळे, ताथवडे, वाकड, रावेत, कासारवाडी येथे या जागा आहेत.

### आयटूआरमधून महापालिकेला ८३ जागांची मिळकत

» पिंपरी-चिंचवड शहरातील उद्योगांच्या जागांचे निवासीकरण (आयटूआर) झाल्यानंतर महापालिकेला शहरातील विविध भागांत एकूण ८३ जागा विनामूल्य प्राप्त झाल्या आहेत. या जागांचे एकूण क्षेत्रफळ सुमारे १ लाख ४६ हजार २३० चौरस मीटर इतके आहे. औद्योगिक वापराची जमीन निवासी किंवा व्यावसायिक प्रकल्पासाठी वापरताना संबंधित विकासकांना एकूण क्षेत्रफळाच्या पाच टक्के जागा महापालिकेला देणे बंधनकारक असते. या प्रक्रियेमुळे महापालिकेला कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेचा लाभ झाला असला तरी त्यातील अनेक जागा अद्याप वापराविना पडून आहेत.

### काही जागांवर अतिक्रमणाची भीती

» महापालिकेच्या ताब्यात आलेल्या अनेक जागांचा अद्याप विकास झालेला नसल्याने काही ठिकाणी अतिक्रमण झाल्याचा दावा करण्यात येत आहे. नगररचना विभागाकडून जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्या भूमी आणि जिंदगी विभागाकडे हस्तांतरित केल्या जातात. त्यानंतर जागांना कुंपण घालण्याची जबाबदारी महापालिकेची असते. मात्र, अनेक जागा रिकाम्या असल्याने त्यांचे संरक्षण आणि देखरेख हा मोठा प्रश्न बनला आहे. भविष्यात या जागांवर बेकायदा बांधकामे किंवा अतिक्रमणे वाढू नयेत यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

# महापालिकेच्या शाळा खासगी संस्थांच्या ताब्यात

## आकांक्षा फाउंडेशनला 108 कोटींच्या प्रस्तावाला बहुमताने मंजुरी; विरोधकांचा खासगीकरणावर आक्षेप

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या वतीने शहरातील विविध भागांत उभारण्यात आलेल्या नाट्यगृहांचे आरक्षण शनिवारी, रविवारी तसेच सुटीच्या दिवशी काही ठराविक संस्थांकडे आणि व्यक्तींकडे असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे इतरांना कार्यक्रम करताना अडचणी येतात. हे टाळण्यासाठी नाट्य संस्थांमधील घटकांशी चर्चा करून ऑनलाइन पद्धतीने बुकिंगसाठी सुटसुटीत व पारदर्शक व्यवस्था निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत शहरातील नाट्यगृह तसेच कलादालनांचे आरक्षण हे ठराविक संस्थांकडेच तसेच व्यक्तींकडेच राहत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या. शनिवार, रविवार तसेच सुट्टीच्या दिवशी काही मोजक्याच व्यक्तींकडेच नाट्यगृहांचा ताबा असतो. त्यामुळे तेथे कार्यक्रम घेण्यासाठी इतरांना त्यांची मनधरणी करावी लागते. यामुळे अनेकदा कार्यक्रम घेण्यासाठी इतरांना अडचणींना तोंड द्यावे लागते. ही मक्तेदारी मोडून काढण्यासाठी निर्णय घ्यावा, अशी चर्चा स्थायी समितीच्या बैठकीत झाली, असे स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी स्पष्ट केले.

नाट्यगृहांच्या आरक्षणासाठी डिजिटल परवानगी प्रणाली आणि केंद्रीय ऑनलाइन बुकिंग व्यवस्था तातडीने कार्यान्वित करण्याच्या सूचना महापालिका प्रशासनाला देण्यात आल्याचे भिमाले यांनी सांगितले. महापालिकेच्या नाट्यगृहांचे अनेकांकडे ३०-४० तारखांचे आरक्षण असते. त्यामुळे अनेकांना तारखा मिळत नसल्याच्या तक्रारी वारंवार केल्या जात आहेत. यासाठी महापालिकेने काही दिवसांपूर्वी आरक्षणासाठी मोबाईल ॲप तयार केले होते. मात्र, त्याला विरोध झाल्याने हा विषय मागे पडला.




### आकांक्षा फाउंडेशनला पुढील तीन वर्षांसाठी जबाबदारी

» पुणे महापालिकेच्या पाच इंग्रजी माध्यम शाळांचे संचालन करणाऱ्या आकांक्षा फाउंडेशनला पुढील तीन वर्षांसाठी शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी प्रति विद्यार्थी २५ हजार रुपये निधी देण्याच्या प्रस्तावाला स्थायी समितीने मंजुरी दिली. या पाच शाळांमध्ये सुमारे साडेचार हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सोमवारी पेठ, भवानी पेठ, बोपोडी, येरवडा आणि कोरेगाव पार्कमधील शाळांचा यात समावेश आहे. २००७ पासून टप्प्याटप्प्याने या शाळांची जबाबदारी फाउंडेशनकडे देण्यात आली असून, विद्यार्थ्यांना दर्जेदार इंग्रजी शिक्षण देण्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

### शाळांच्या कार्यपद्धतीचा होणार अभ्यास

» आकांक्षा फाउंडेशनच्या माध्यमातून चालवल्या जाणाऱ्या शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता, व्यवस्थापन आणि निकाल यांचे स्वतंत्र ऑडिट करण्यात येणार आहे. तसेच या शाळांमधील यशस्वी उपक्रम महापालिकेच्या इतर शाळांमध्ये राबविता येतील का, याचा अभ्यास करण्यासाठी महापौरांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन केली जाणार आहे. शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचा सहभाग असलेल्या या समितीमार्फत शैक्षणिक मॉडेलचे मूल्यमापन केले जाणार आहे. यामुळे महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये दर्जेदार शिक्षणाच्या संधी उपलब्ध करण्याचा प्रयत्न होणार आहे.

### विरोधकांचा खासगीकरणावर आक्षेप

» स्थायी समितीतील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्यांनी या प्रस्तावाला तीव्र विरोध केला. समिती सदस्य प्रशांत जगताप यांनी महापालिकेच्या शाळांसाठी १०८ कोटी रुपयांचा खर्च करून खासगी संस्थेला लाभ देण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे सुहास टिंगरे, अमोल बालवडकर आणि वैशाली बनकर यांनीही या भूमिकेला पाठिंबा दिला. सर्वांना दर्जेदार व मोफत शिक्षणाचा अधिकार आहे; मात्र त्यासाठी महापालिकेच्या शाळा खासगी संस्थांच्या ताब्यात देणे योग्य नसल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे.

---

# सासवडमध्ये दोन सार्वजनिक उद्याने बंद; नागरिकांचा रोष वाढला

## देखभालअभावी उद्याने बंद असल्याने मुले, ज्येष्ठ नागरिक आणि फिरण्यासाठी येणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे

**पुणे | प्रतिनिधी**

शहराच्या वाढत्या नागरीकरणासोबत नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीत सार्वजनिक उद्यानांची भूमिका महत्त्वाची ठरते. सासवड शहरात एकूण सहा सार्वजनिक उद्याने असली, तरी त्यापैकी दोन महत्त्वाची उद्याने गेल्या अनेक दिवसांपासून बंद असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि सकाळ-सायंकाळ फिरण्यासाठी उद्यानांवर अवलंबून असलेल्या नागरिकांची गैरसोय होत आहे.

सध्या शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, सोपाननगरमधील नाना-नानी पार्क, राणी लक्ष्मीबाई उद्यान आणि गणेशबाग ही चार उद्याने नागरिकांसाठी खुली असून, त्यांचा नियमित वापर होत आहे. यापैकी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात स्वच्छता, देखभाल आणि सुरक्षेची विशेष काळजी घेतली जात असल्याचे दिसून येते. उद्यान परिसर स्वच्छ ठेवण्यात आला असून, सुरक्षा रक्षकांचीही नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे या उद्यानाचा लाभ दररोज मोठ्या संख्येने नागरिक घेत आहेत.

मात्र, राजमाता जिजाऊ उद्यान आणि आचार्य अत्रे उद्यान ही दोन्ही उद्याने देखभाल व दुरुस्तीअभावी बंद आहेत. या उद्यानांच्या बंद अवस्थेमुळे परिसरातील मुलांना खेळण्यासाठी तसेच नागरिकांना विरंगुळ्यासाठी उपलब्ध असलेल्या सार्वजनिक जागा कमी पडत आहेत. उद्यानांचे दरवाजे बंद असल्याने अनेकांना निराश होऊन परत जावे लागत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

शहरातील वाढती लोकसंख्या आणि खुल्या जागांची घटती उपलब्धता लक्षात घेता उद्यानांचे महत्त्व अधिक वाढले आहे. त्यामुळे बंद असलेल्या उद्यानांची तातडीने दुरुस्ती करून ती नागरिकांसाठी खुली करावीत, अशी मागणी जोर धरत आहे. सध्या मुलांना खेळण्यासाठी आणि कुटुंबीयांना विरंगुळ्यासाठी वाघ डोंगर परिसरातील वन विभागाच्या उद्यानाचा आधार घ्यावा लागत आहे.



### चार उद्यानांमध्ये नियमित गर्दी

» सध्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, नाना-नानी पार्क, राणी लक्ष्मीबाई उद्यान आणि गणेशबाग ही चार उद्याने नागरिकांसाठी खुली आहेत. विशेषतः भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात स्वच्छता, देखभाल आणि सुरक्षेची योग्य व्यवस्था करण्यात आली आहे. उद्यान परिसर स्वच्छ असून सुरक्षा रक्षकांचीही नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे या उद्यानात दररोज मोठ्या प्रमाणात नागरिक भेट देत आहेत. सकाळच्या व्यायामापासून मुलांच्या खेळापर्यंत विविध उपक्रम येथे सुरू असतात. या उद्यानांच्या चांगल्या व्यवस्थापनाचे नागरिकांकडून कौतुकही केले जात आहे.

# VIP दर्शन बंद, आता सर्व भाविकांसाठी एकच नियम

## अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाई सत्रामुळे पुन्हा एकदा त्यांच्या बदलीची चर्चा रंगली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

भीमाशंकर देवस्थानाने सर्वसामान्य भाविकांना मोठा दिलासा देत व्हीआयपी दर्शन व्यवस्था बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, आता कोणत्याही व्हीआयपी व्यक्तीला स्वतंत्र दर्शन सुविधा दिली जाणार नाही. याच बरोबर सर्व भाविकांसाठी एकच नियम असणार असून ऑनलाईन बुकिंगशिवाय दर्शनाला प्रवेश मिळणार नसल्याची देखील माहिती भीमाशंकर देवस्थानाकडून देण्यात आली आहे.

भीमाशंकर देवस्थान आणि जिल्हा प्रशासनाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार आता शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी किंवा इतर कोणत्याही व्हीआयपी व्यक्तीसाठी स्वतंत्र दर्शन व्यवस्था उपलब्ध राहणार नाही. दर्शन व्यवस्थेत समानता आणि पारदर्शकता आणण्याच्या उद्देशाने हा निर्णय लागू करण्यात आला आहे.



भीमाशंकर देवस्थानाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, सध्या 24 तारखेपर्यंतचे सर्व ऑनलाईन बुकिंग स्लॉट भरले आहे. यामुळे भाविकांनी दर्शनासाठी किमान दोन दिवस अगोदर ऑनलाईन बुकिंग करुनच यावे असं आवाहन देवस्थान प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारींच्या बैठकीत असं ठरलेलं आहे की, व्हीआयपी असं काही नाहीये. ज्यांना दर्शन करायचं असेल त्यांनी सर्वांनी बुकिंग केल्यानंतर यावं. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, सर्व मंडळींनी, शासकीय असो किंवा कोणीही असो त्यांनी सर्वांनी बुकिंग करावं आणि बुकिंग लाईनने दर्शनाला यावं असं माध्यमांशी बोलताना भीमाशंकर देवस्थानचे मुख्य विश्वस्त मधुकर गवांदे म्हणाले.

भीमाशंकर दर्शनासाठी नियमावली तयार करण्यात आली असून या नियमांनुसार, मंदिर व्यवस्थापन समितीचे अधिकृत वेबसाईटवर बुकिंग करावे. प्रति दिन हजार भाविकांना प्रवेश देण्यात येणार आहे. तसेच नोंदणीकृत भाविकांची यादी माहितीसाठी वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. 15 ते 30 जूनपर्यंत दररोज सकाळी 7 ते 11 पर्यंत दर्शन सुविधा उपलब्ध राहणार आहे. याच बरोबर ऑनलाई भाविकांनी दर्शनासाठी येताना वैध ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहणार आहे असं देखील भीमाशंकर देवस्थानाकडून सांगण्यात आले आहे.

### व्हीआयपी संस्कृतीला पूर्णविराम

**» भीमाशंकर देवस्थान आणि जिल्हा प्रशासनाने दर्शन व्यवस्थेत समानता आणण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यापुढे कोणत्याही शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी किंवा अन्य व्हीआयपी व्यक्तीसाठी स्वतंत्र दर्शन व्यवस्था उपलब्ध राहणार नाही. सर्व भाविकांना समान नियम लागू असतील. या निर्णयामुळे सामान्य भाविकांना मोठा दिलासा मिळाला असून दर्शन प्रक्रियेत पारदर्शकता वाढणार आहे. देवस्थान प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, कोणालाही विशेष सवलत दिली जाणार नसून सर्वांनी नियमानुसार ऑनलाइन नोंदणी करूनच दर्शनासाठी यावे लागणार आहे.**

### ऑनलाइन बुकिंगशिवाय प्रवेश नाही

**» भीमाशंकर दर्शनासाठी आता ऑनलाइन बुकिंग अनिवार्य करण्यात आले आहे. मंदिर व्यवस्थापन समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी केल्यानंतरच दर्शन पास उपलब्ध होणार आहे. सध्या २४ जूनपर्यंतचे सर्व स्लॉट भरले असल्याने भाविकांनी किमान दोन दिवस आधी बुकिंग करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दररोज केवळ एक हजार भाविकांना प्रवेश दिला जाणार आहे. नोंदणीकृत भाविकांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार असून दर्शनासाठी येताना वैध ओळखपत्र सोबत आणणे बंधनकारक राहणार आहे.**

### कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर तयारी

**» सन २०२७ मध्ये नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर येथे भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. यासाठी मंदिर परिसरात नवीन सभामंडप, दर्शनबारी आणि इतर सुविधा उभारण्यात आल्या आहेत. १५ ते ३० जूनदरम्यान दररोज सकाळी ७ ते ११ या वेळेत दर्शन सुविधा उपलब्ध राहणार आहे. गर्दी नियंत्रण, सुरक्षा आणि भाविकांना सुलभ दर्शन मिळावे यासाठी ही नियमावली तयार करण्यात आली असून प्रशासनाने सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.**

# पुण्यात बांधकाम व्यवसायिकांसाठी भरमसाठ वृक्षतोड ? उच्च न्यायालयात धाव..

## महापालिका प्रशासनाने अत्यंत महत्त्वाची असलेल्या वृक्ष प्राधिकरण समितीची स्थापना केलेली नाही.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेतील प्रशासक राज संपुष्टात येऊन चार महिने झाल्यानंतर देखील महापालिका प्रशासनाने अत्यंत महत्त्वाची असलेल्या वृक्ष प्राधिकरण समितीची स्थापना केलेली नाही. त्यामुळे शहरात वृक्षतोड करण्यासाठीचे प्रस्ताव महापालिका प्रशासनाच्या मर्जीने मनमानी करत मान्य केले जात असल्याचा आरोप केला जात आहे.



महापालिकेने वृक्षप्राधिकरण समितीची स्थापना करावी अशी मागणी वारंवार करूनही त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने महापालिकेच्या विरोधात उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नगरसेवक दत्तात्रय बहिरट यांनी ही याचिका दाखल केली आहे. पुण्याच्या पर्यावरणाबाबत महापालिका गंभीर नसल्याचा आरोप बहिरट यांनी पत्रकार परिषदेत केला.

महापालिका आयुक्तांकडे वारंवार वृक्ष प्राधिकरण समितीची स्थापना करावी, अशी मागणी करूनही त्याकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळे न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आल्याचे बहिरट यांनी सांगितले. सामाजिक कार्यकर्ते पुष्कर कुलकर्णी यांनी ही याचिका दाखल केली. सत्या मुळे यांच्या वतीने ही याचिका दाखल करण्यात आली आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेला यासाठी प्रतिवादी करण्यात आले आहे.

महापालिकेने वृक्ष प्राधिकरण समितीची स्थापना केली असती तर शहरातील विविध भागांत मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या वृक्षतोडीवर नियंत्रण ठेवणे शक्य झाले असते. मात्र, आयुक्त नवल किशोर राम यांना ही समिती स्थापन करण्यात रस नसल्याने तेच सर्व अधिकार वापरून बांधकाम व्यावसायिकांच्या हितासाठी चुकीचे निर्णय घेत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

### ‘हरित क्षेत्राची टक्केवारी चिंताजनक’

**» महापालिकेच्या आकडेवारीनुसार शहराच्या क्षेत्रफळाच्या केवळ १०.१ टक्के इतकेच क्षेत्र हे हरित क्षेत्र आहे. वास्तविक हे प्रमाण कमीत कमी १८ टक्के इतके हवे. तसेच, पुण्याची लोकसंख्या ही ६० लाख इतकी असून, त्या तुलनेत पुण्यात केवळ ५७ लाख इतकीच झाडे आहेत. शहरात निकषानुसार चार कोटी झाडे असण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.**